# SCHOOL TRANSPORT MEETING

**Day:- Monday** **Date :- 14/07/2023** **Time :- 4.00 P.M**

## OFFICIALS ATTENDING THE MEETING

| | | |
|---|---|---|
| **1. R.T.O. Officer** | : | Mr.Omkar Puri |
| **President** | : | Mr. Chandrakant Shete |
| **Secretary** | : | Mr. Kishor Rajas |
| **Principal** | : | Mrs. Nutan Kamble |
| **Vice-Principal** | : | Mrs. Kanchan Kadu |

## SUPERVISORS

| | | |
|---|---|---|
| **Primary** | : | Mrs. Leena Pargi |
| **Secondary** | : | Mr. Sagar Kenjoor |
| **Sport's Teacher** | : | Mr. Mahadev Kharatmal |
| **Office Superitend** | : | Mrs. Sujata Kulkarni |

# SCHOOL TRANSPORT MEETING

## LIST OF RICKSHA & BUS DRIVERS

| Name Of The Drivers | Mobile No. |
|---|---|
| 1. Mr. Hanumant Murhe | 9881725584 |
| 2. Mr. Vijay Mhalaskar | 9823965700 |
| 3. Mr. Bharat Vahile | 8796906309 |
| 4. Mr. Dnyaneshwar Vairagi | 9890892274 |
| 5. Mr. Nilesh Jagtap | 8308287715 |
| 6. Mr. Mahendra Borade | 9860152525 |
| 7. Mr. Vinayak Pingale | 9011852827 |
| 8. Mr. Prasad Karpe | 9823545123 |
| 9. Mr. Jitendra Gaikwad | 9764190119 |
| 10. Mr. Govind Asawle | 9175913211 |
| 11. Mr.Rohan Kshirsagar | 7040439539 |
| 12. Mr. Sunil Nakhate | 9881808097 |

her's Signature:..................

# ट्रॅफिक कमिटी मीटिंग

सोमवार दि. १४/०७/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता कॉन्फरन्स हॉलमध्ये " ट्रॅफिक कमिटीसाठी " शाळेचे सर्व रिक्षाकाका व बसचालक यांची सभा घेण्यात आली. सदर सभेस अध्यक्ष मा.श्री चंद्रकांत शेटे, सचिव श्री किशोर राजस, मुख्याध्यापिका सौ.नूतन कांबळे व सौ.कांचन कडू, सुपरवायजर्स व ओ. एस. इ. उपस्थित होते.

प्रथम मुख्याध्यापिका सौ.नूतन कांबळे यांनी सर्व रिक्षा व बसवाले काका यांचे अभिनंदन केले व त्यांना आवश्यक ती कागदपत्रे शाळेच्या ऑफिसमध्ये जमा करण्यास सांगितले. सर्व कागदपत्रे उदा.LIC copy with photo ,PUC ,Vehicle no .,Insurance copy ,Personal Information ,Permit (All Xerox with self-attestation ) इ. साक्षांकित करण्यास सांगितले. परमिट दुसऱ्याचे असले तरी चालेल परंतू ते जमा करणे आवश्यक आहे. कारण ही सर्व माहिती आरटीओ ऑफिसमध्ये द्यावी लागते.

मुख्याध्यापिका सौ.नूतन कांबळे यांनी रिक्षाकाकांनी पालकांशी रागावून उद्धटपणे बोलू नये, रिक्षामध्ये विद्यार्थ्यांना जबाबदारीने वागण्यास शिकवावे, मस्ती आरडाओरडा यावर बंधने घालावीत. तसेच एका विद्यार्थ्याला उशीर झाला तर त्यांच्यामुळे बाकी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, त्यांना लेटमार्क लागू नये याची काळजी घ्यावी. मुलांना उशीर झाला तर आत येऊन जबाबदार व्यक्तीला सांगा व गेटवरच मुलांना सोडून जाऊ नका. रिक्षाकाकांकडे मुलांचे हजेरीपत्रक आवश्यक आहे. तसेच रिक्षाचा जर संप असेल तर पालकांनी विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्याची जबाबदारी घ्यावी. तसेच मीटिंगसाठी बोलावलेले असते तसेच सर्व रिक्षावाल्यांनी एकत्रितपणे, संघटितरित्या व सहकार्याने काम करावे.

मा. अध्यक्षांनी आपल्या भाषणात सांगितले कि अर्धा कि.मी. च्या पुढे अंतर असेल तर स्कूल बस असावी , परंतू स्थानिक रिक्षावाल्यांच्या विचार करून शाळेने स्कूल बस चालू केली नाही. नवीन नियमावलीनुसार सर्व कागदपत्रे ऑफिसमध्ये जमा करावीत कारण शासनाला व आरटीओ ऑफिसला सर्व कागदपत्रे जमा करावयाची आहेत. मुलांची सुरक्षितता प्राधान्याने पाहावी, विद्यार्थी मर्यादितच असावेत, वेगमर्यादा पाळावी. वेळेच्या बाबतीत सतर्क राहावे. अगदी अपरिहार्य कारणास्तव

सवलत मिळेल. रिक्षावाल्या काकांची अशी वागणूक असावी की,शालेय जीवन संपल्यावरही त्यांना त्यांच्याबद्दल प्रेम वाटले पाहिजे. संस्थेस सेवा देत असलेले रिक्षाकाका व स्कूलबस काका यांच्यावर सर्व मुलांची जबाबदारी असून संस्थेवर नाही. शाळेत विद्यार्थ्यांना आणता व नेताना कुठल्याही वर्गातील विद्यार्थिनीला फ्रंटसीटवर बसवू नये, शाळा, कॉलनी परिसरात असल्यामुळे मोठ्या गाड्या लांब उभ्या कराव्यात, असे सांगून त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

सचिव श्री.किशोर राजस सर यांनी आपल्या भाषणात नमूद केले कि बदली ड्रायव्हर दिल्यास त्याची जबाबदारी शाळेवर नाही. बदली ड्रायव्हरचे आधार कार्ड व पॅन कार्ड लायसन याचा तपशील शाळेत जमा करावा. नंतर रिक्षाकाका व मॅनेजमेंट मेंबर यांच्यात चर्चा होऊन रिक्षाकाकांसाठी छोटे गेट मोठे करतोय. संस्था आपली जबाबदारी पाळेल पण तेवढीच तुमचीही जबाबदारी आहे. सचिव श्री. किशोर राजस यांनी सांगितले कि रिक्षाकाकांनीही आपल्या रिक्षा लाईनमध्ये भिंतीला टेकून लावाव्यात, जेणेकरून वाहतुकीची कोंडी होणार नाही.

आरटीओ ऑफिसर श्री. ओंकार पुरी, यांनी आपल्या भाषणात सांगितले की रिक्षामध्ये Woman attendant असणे आवश्यक आहे , प्रत्येक ड्रायव्हर काकांचे मेडिकल फिटनेस आवश्यक आहे, रिक्षामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी आवश्यक आहे, सीटबेल्ट लावणे आवश्यक आहे, गाडीचा फिटनेस तसेच युनिफॉर्म घालणे आवश्यक आहे. रिक्षामध्ये मुले कोंबू नयेत. रिक्षा चालवताना मोबाईलचा वापर करू नये.

मुख्याध्यापिका सौ.नूतन कांबळे यांनी सर्वांचे आभार मानून व "कॉफीपानाने " कार्यक्रमाची सांगता झाली.